सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जिल्हाआपत्तीव्यवस्थापनप्राधिकरण, जिल्हाधिकारीकार्यालय, गोंदिया (नैसर्गीकआपत्तीशाखा)
दुरध्वनीक्र. 07182-236147, टोलफ्रीक्र. 1077 - फॅक्स क्र. - 07182-236145
E-mail - rdcgon@gmail.com, collector.gondia@maharashtra.gov.in

क्र.आ.व्य./कोरोना/विषाणू/661 /2021
दिनांक - 14 / 05 /2021

वाचा -
1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30,33,34,41 व कलम 51
2. साथरोग अधिनियम 1897
2. महाराष्ट्र शासन क्रमांक कोरोना 2020/प्रा.क्र.58/आरोग्य-5, दिनांक 14 मार्च 2020
3. महाराष्ट्र शासन क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 27.03.2021
4. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-283/2021 दिनांक 31.03.2021
5. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.04.04.2021
6. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-300/2021 दिनांक 05.04.2021
7. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.13.04.2021
8. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-359/2021 दिनांक 15.04.2021
9. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.20.04.2021
10. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-431/2021 दिनांक 20.04.2021
11. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.21.04.2021
12. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-459/2021 दिनांक 22.04.2021
13. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.29.04.2021
14. या कार्यालयाचे आदेश क्र.नै.आव्य./कारोना/आदेश/कावि-542/2021 दिनांक 30.04.2021
15. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.12.05.2021

---

## // आदेश //

उपरोक्त संदर्भीय अधिनियम 1 अन्वये कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोटकलम 2 (अ) अन्वये जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत. त्यानुषंगाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतुदींची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

तसेच राज्यात कोरोना विषाणूचा (कोव्हीड-19) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाने कडक निर्बंध लागू केले आहे व उपरोक्त संदर्भीय क्र. 03 अन्वये जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषीत केलेले आहे.

त्याअर्थी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून उपरोक्त दिनांक 15.05.2021 च्या सकाळी 07.00 पर्यंतच्या लॉकडाऊन संदर्भात (BREAK THE CHAIN) संदर्भीय आदेश क्र. 05, 07, 11, व 13 अन्वये मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या होत्या त्या अनुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे या स्तरावर वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

परंतु शासनाच्या मते कोव्हीड-19 विषाणूचा धोका अद्यापही टळलेला नसून सदर विषाणूचा प्रसार वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता उपरोक्त संदर्भीय क्र. 15 अन्वये (BREAK THE CHAIN) कोव्हीड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दिनांक 15.05.2021 च्या सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या लॉकडाऊनच्या कालावधीत वाढ करण्यात येत असून इतर उपरोक्त संदर्भीय

आदेशांमध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेसह सदरचा लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 15.05.2021 चे सकाळी 07.00 वाजेपासून ते दिनांक 01.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाने दिनांक 01.06.2021 च्या सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या लॉकडाऊनच्या कालावधीत उपरोक्त संदर्भीय क्र. 15 अन्वये खालीलप्रमाणे बाबी समाविष्ट करण्यात आलेल्या असून उपरोक्त संदर्भीय आदेशांमध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेसह व खालील सर्व उपक्रम अटी व शर्तीसह सुरू राहतील.

i. कोणत्याही वाहतुकीद्वारे महाराष्ट्रात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीकडे नकारात्मक आरटीपीसीआर अहवाल बाळगणे आवश्यक आहे. सदरचा आरटीपीसीआर अहवाल महाराष्ट्रात प्रवेश करण्याच्या जास्तीत जास्त 48 तासापुर्वीचा असावा.

ii. दिनांक 18 एप्रिल 2021 आणि दिनांक 01 मे 2021 रोजीच्या आदेशान्वये संवेदनशील उत्पत्तीच्या भागातून आलेल्या व्यक्तींना लागू करण्यात आलेली सर्व बंधने देशाच्या कुठल्याही भागातून राज्यात प्रवेश करणाऱ्या व्यक्तीस लागू राहतील.

iii. मालवाहक वाहनांच्या बाबतीत, ज्यामध्ये दोनपेक्षा जास्त व्यक्ती नसलेल्या (ड्रायव्हर + क्लिनर / मदतनीस) वाहनांच्या वाहतूकीस परवानगी देण्यात येते. तसेच सदरचे मालवाहक वाहन हे इतर राज्यातुन येत असून त्यांचेकडे नकारात्मक आरटीपीसीआर अहवाल असल्यास त्यांना महाराष्ट्र राज्यात प्रवेश करण्याची परवानगी देण्यात येईल. सदरचा आरटीपीसीआर अहवाल महाराष्ट्रात प्रवेश करण्याच्या जास्तीत जास्त 48 तासापुर्वीचा असावा व त्याची वैधता 07 दिवसाची असावी.

iv. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने ग्रामीण बाजारावर तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीवर (APMC) विशेष लक्ष ठेवावे आणि कोव्हीड-19 च्या अनुषंगाने सर्व वर्तणूक / बाबी योग्य अमलात्याची खात्री करावी. तसेच अश्या एखाद्या ठिकाणी कोव्हीड-19 चा प्रसार न होण्यासाठी शिस्त लावणे कटीण वाटत असल्यास स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सदरचे ठिकाण बंद करण्याचे निर्णय घेऊ शकतील किंवा पुढील निर्बंध लावु शकतील.

v. दुध संकलन, वाहतूक आणि प्रक्रिया यांना निर्बंधाशिवाय परवानगी असू शकेल. आवश्यक असलेल्या वस्तुंबरोबर किंवा घरपोच सेवाद्वारे विक्री करणाऱ्या दुकानावर घातलेल्या निर्बंधाच्या अधीन राहून किरकोळ विक्रीस परवानगी देण्यात येते.

vi. विमानतळ आणि बंदर सेवामध्ये कार्यरत असलेले आणि कोव्हीड-19 व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेले औषधे किंवा उपकरणे वाहतुकीकरीता आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांना स्थानिक, मोनो आणि मेट्रो सेवांमध्ये प्रवास करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

vii. स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण हे साधारण असे किंवा विशिष्ट क्षेत्रांमध्ये किंवा विशिष्ट भागात राज्य आपत्ती व्यवस्थापनास कळवून निर्बंध लावण्याचा निर्णय घेऊ शकेल. तसेच संबंधीत निर्बंध लागु करण्यापुर्वी किमान 48 तासापुर्वी सार्वजनिक नोटीस दिली जाईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 15.05.2021 चे सकाळी 07.00 वाजेपासून ते दिनांक 01.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील.

सदर आदेशाचे पालन न करणारी/उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समूह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक 14/05/2021 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,

( दीपक कुमार मीना )
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

**प्रतिलीपी - सबब माहितीस्तव सविनय सादर / उचित कार्यवाहीस अग्रेषित.**

1) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई-32
2) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
4) पोलीस अधिक्षक, गोंदिया
5) अपर जिल्हाधिकारी, गोंदिया
6) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी -------------------(सर्व)
7) पोलीस उपविभागीय अधिकारी ---------------(सर्व)
8) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व) ................................
9) गट विकास अधिकारी (सर्व)
10) जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया
11) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पंचायत गोंदिया
12) मुख्याधिकारी, नगरपरिषद/पंचायती सर्व
13) सर्व विभाग प्रमुख/कार्यालयप्रमुख
14) ..............................................................................................................

15/05/14

( दीपक कुमार मीना )
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया.